# नियामक निगमांच्या (रेग्युलेटरी बॉडी) संदर्भात माहितीचा अधिकार कसा वापरावा?

## शब्दावली

- **केंद्रीय माहिती आयोग:-** माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २(ख) अन्वये व्याख्या. केंद्रीय माहिती आयोग हे केंद्र सरकारच्या अधीन सार्वजनिक प्राधिकरणांशी संबंधित तक्रारी आणि अपीलांवर कार्यवाही करण्यास सक्षम प्राधिकरण आहे.

- **माहिती:-** कलम २(च) अन्वये कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य, ज्यामध्ये अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिद्धीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यांवये सार्वजनिक प्राधिकरणास मिळवता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती यांचा समावेश होतो.

- **सार्वजनिक प्राधिकरण:-** *कलम २(ज) अन्वये सार्वजनिक प्राधिकरण याचा अर्थ, --*

*क. संविधानाद्वारे किंवा तदन्वये;*

*ख. संसदेने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे;*

*ग. राज्य विधानमंडळाने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे;*

*घ. समुचित शासनाने काढलेल्या अधिसूचनेद्वारे किंवा आदेशाद्वारे स्थापन करण्यात आलेले किंवा घटित करण्यात आलेले कोणतेही प्राधिकरण किंवा निकाय किंवा स्वराज्य संस्था, असा आहे आणि त्यामध्ये,*

*(एक) समुचित शासनाची मालकी असलेला, त्याचे नियंत्रण असलेला किंवा त्याच्याकडून निधीद्वारे ज्याला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठ्या प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो असा निकाय;*

*(दोन) समुचित शासनाकडून निधीद्वारे जिला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठ्या प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो, अशी आशासकीय संघटना, यांचा समावेश होतो.*

- **माहितीचा अधिकार:-** *माहितीचा अधिकार याचा अर्थ, कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली व या अधिनियमान्वये मिळवता येण्याजोगी माहिती मिळवण्याचा अधिकार, असा आहे आणि त्यामध्ये:-*

*(एक) एखादे काम, दस्तऐवज, अभिलेख यांची पाहणी करणे;*

*(दोन) दस्तऐवजांच्या किंवा अभिलेखांच्या टिपण्या, उतारे किंवा प्रमाणित प्रति घेणे;*

*(तीन) सामग्रीचे प्रमाणित नमुने घेणे;*

*(चार) डिस्केट, फ्लॉपी, टेप, व्हिडीओ कॅसेट या स्वरूपातील किंवा कोणत्याही अन्य इलेक्ट्रॉनिक प्रकारातील माहिती किंवा जेव्हा अशी माहिती संगणकात किंवा अन्य कोणत्याही उपकरणात साठवलेली असेल त्याबाबतीत मुद्रित प्रती (प्रिंटआऊट) मार्फत माहिती मिळवणे; यांबाबतच्या अधिकाराचा समावेश होतो.*

- **राज्य माहिती आयोग:-** माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २(ख) अन्वये व्याख्या. राज्य माहिती आयोग हे राज्य सरकारच्या अधीन सार्वजनिक प्राधिकरणांशी संबंधित तक्रारी आणि अपीलांवर कार्यवाही करण्यास सक्षम प्राधिकरण आहे.

**१. नियामक निगम म्हणजे काय?**

नियामक अभिकरणे (रेग्युलेटरी एजन्सीज) किंवा नियामक निगमे (रेग्युलेटरी बॉडीज) या बँकिंग, विमा, प्रतिभूती (रोखे) विनिमय (सिक्युरिटी एक्स्चेंज), दूरसंचार अशा काही कार्यक्षेत्रांवर स्वायत्त प्रभुत्व असण्यासाठी नियुक्त सरकारी प्राधिकरणे असतात. या क्षेत्रांमधील काही नियामक निगम पुढीलप्रमाणे आहेत:-

क. **बँकिंग:-** भारताची रिझर्व्ह बँक (रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया - आरबीआय)

ख. **विमा:-** विमा नियामक आणि विकास प्राधिकरण (इन्श्युरन्स रेग्युलेटरी अँड डेव्हलपमेंट ऑथॉरिटी - आयआरएडीएआय)

ग. **प्रतिभूती (रोखे):-** भारतीय प्रतिभूती आणि विनिमय बोर्ड (सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया - सेबी)

घ. **दूरसंचार:-** भारतीय दूरसंचार विनियामक प्राधिकरण (टेलिकॉम रेग्युलेटरी ऑथॉरिटी ऑफ इंडिया - टीआरएआय)

**२. नियामक निगमे माहितीच्या अधिकाराच्या कक्षेत येतात काय?**

सर्व नियामक निगम केंद्र सरकारच्या अखत्यारीत येतात आणि सार्वजनिक असल्याने कलम २(ज)(ख) अन्वये माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कक्षेत येतात. कलम २(ज) चा संबंधित भाग खाली उद्धृत केलेला आहे:-

*कलम (२)(ज) "सार्वजनिक प्राधिकरण म्हणजे --*

*क. संविधानाद्वारे किंवा तदन्वये;*

*ख. संसदेने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे;*

*ग. राज्य विधानमंडळाने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे;*

*समुचित शासनाने काढलेल्या अधिसूचनेद्वारे किंवा आदेशाद्वारे स्थापन करण्यात आलेले किंवा घटित करण्यात आलेले कोणतेही प्राधिकरण किंवा निकाय किंवा स्वराज्य संस्था, असा आहे.*

**३. नियामक निगमांच्या संदर्भात माहितीचा अधिकार कसा वापरावा?**

माहितीचा अधिकार अधिनियमाच्या अंतर्गत माहिती देणे हे नियामक निगमांचे दायित्व आहे. अशी माहिती खालील मुद्यांना अनुसरून मागता येऊ शकेल:-

**३.१ भारताची रिझर्व्ह बँक (रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया - आरबीआय):-** भारताची रिझर्व्ह बँक (रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया - आरबीआय) देशातील बँकिंग कार्याचे नियमन करते. पुढील बाबींची माहिती मागण्यासाठी माहितीचा अधिकार अधिनियम उपयुक्त ठरतो:-

**क.** बँकिंग अहवाल

**ख.** केंद्रीय मंडळाच्या (सेंट्रल बोर्ड) बैठकीची इतिवृत्ते

**ग.** काही माहिती भारताच्या रिझर्व्ह बँकेच्या (रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया - आरबीआय) या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**घ.** भारताच्या रिझर्व्ह बँकेच्या (रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया - आरबीआय) या संकेतस्थळाद्वारे ऑनलाईन सादर करता येते. टपालाद्वारे अपील सादर केल्यास ते पुढीलप्रमाणे संबोधित करावे:-

१. **श्री राधा श्याम राठोड**
कार्यकारी संचालक (प्रथम अपिलीय प्राधिकारी)
भारताची रिझर्व्ह बँक (रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया)
केंद्रीय कार्यालय इमारत (सेंट्रल ऑफिस बिल्डिंग), शहिद भगतसिंग मार्ग,
मुंबई - ४००००१

२. **श्री विवेक दीप**
कार्यकारी संचालक (प्रथम अपिलीय प्राधिकारी)
भारताची रिझर्व्ह बँक (रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया)
केंद्रीय कार्यालय इमारत (सेंट्रल ऑफिस बिल्डिंग), शहिद भगतसिंग मार्ग,
मुंबई - ४००००१

ङ. अशाप्रकारे सादर केलेल्या अपिलांच्या प्रगतीबाबतची माहिती ती दाखल केल्यावर त्यांना दिलेला नोंदणी क्रमांक (रजिस्ट्रेशन नंबर) वापरून मिळवता येते.

३.२ **विमा नियामक आणि विकास प्राधिकरण (इन्श्युरन्स रेग्युलेटरी अँड डेव्हलपमेंट ऑथॉरिटी - आयआरडीएआय):-** हे भारतातील विमा क्षेत्राचे नियमन करणारे नियामक निगम आहे.

**क.** आयआरडीएआयने अधिनियमाच्या कलम ४(१)(ख), (४(१)(घ) आणि ४(१)(ग) अन्वये माहितीचे प्रकटन केलेले आहे.

**ख.** आयआरडीएआयने नुकतीच त्याच्या माहितीचा अधिकार अधिनियमानुसार पदनिर्देशित जन माहिती अधिकाऱ्यांची ही यादी जाहीर केली आहे.

**ग.** माहितीचा अर्ज या संकेतस्थळाद्वारे ऑनलाईन किंवा टपालाद्वारे पुढील पत्त्यावर पाठवून सादर करता येईल:-

**आयआरडीएआय**
स. नं. ११५/१

वाणिज्यिक क्षेत्र (फायनान्शियल डिस्ट्रिक्ट), नानकरामगुडा,
गचीबोवली, हैद्राबाद - ५०००३२

**घ.** अपील सादर करताना ते पुढीलप्रमाणे संबोधित करावे:-

**श्री रणदीप सिंग जगपाल**
मुख्य महाव्यवस्थापक, आयआरडीएआय
स. नं. ११५/१, वाणिज्यिक क्षेत्र (फायनान्शियल डिस्ट्रिक्ट), नानकरामगुडा,
गचीबोवली, हैद्राबाद - ५०००३२

**३.३ भारतीय प्रतिभूती आणि विनिमय बोर्ड (सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया - सेबी):-** सेबी हे भारतातील प्रतिभूती (रोखे) विनिमयाचे नियंत्रण करणारे नियामक निगम आहे.

**क.** माहितीचा अर्ज या संकेतस्थळाद्वारे ऑनलाईन किंवा टपालाद्वारे सादर करण्याची तरतूद आहे.

**ख.** सेबीने माहितीच्या अधिकारानुसार या माहितीचे स्वेच्छा प्रकटन केले आहे.

**ग.** केंद्रीय माहिती आयोगाच्या आदेशांनुसार, सेबीने पुढील माहिती त्यांच्या संकेतस्थळावर प्रकट केली:-

१. श्री कपिल विनायक विरुद्ध केंद्रीय जन माहिती अधिकारी, सेबी प्रकरणातील केंद्रीय माहिती आयोगाच्या आदेशाला अनुसरून डीएमसी टीक युनिट योजनेच्या परताव्याच्या संदर्भातील हा अहवाल.
२. श्री भूपेंदर चौधरी विरुद्ध केंद्रीय जन माहिती अधिकारी, सेबी प्रकरणातील केंद्रीय माहिती आयोगाच्या अर्जदाराला माहिती देण्याच्या आदेशाला अनुसरून युनिकॉर्न सिक्युरिटीज प्रा लि च्या संदर्भातील माहिती.

**३.४ भारतीय दूरसंचार विनियामक प्राधिकरण (टेलिकॉम रेग्युलेटरी ऑथॉरिटी ऑफ इंडिया - टीआरएआय):-** टीआरएआय ही भारतातील दूरसंचार सेवापुरवठादारांचे नियमन करणारे नियामक निगम आहे. टीआयआयच्या या संकेतस्थळावर पुढील माहिती उपलब्ध आहे:-

**क.** टीआरएआय माहितीपुस्तिका
**ख.** अपिलीय प्राधिकाऱ्यांची नावे आणि पत्ते
**ग.** पारदर्शकता अधिकाऱ्यांची नावे व पत्ते
**घ.** पूर्ववर्ती माहितीच्या अधिकाराखालील अर्ज आणि त्यांना दिलेली उत्तरे
ङ. कर्मचाऱ्यांच्या विरुद्ध दाखल खात्यांतर्गत किंवा न्यायालयीन प्रकरणांचे तपशील
**च.** टीआरएआयकडे सादर करण्याचा माहितीच्या अधिकाराखालील अर्ज पुढीलप्रमाणे संबोधित करावा:-

**भारतीय दूरसंचार विनियामक प्राधिकरण (टेलिकॉम रेग्युलेटरी ऑथॉरिटी ऑफ इंडिया)**

महानगर दूरसंचार भवन, जवाहरलाल नेहरू मार्ग
(जुना मिंटो रोड), नवी दिल्ली - ११०००२

विरजू कुमार विरुद्ध टीआरएआय या प्रकरणात केंद्रीय माहिती आयोगाने असा निकाल दिला की अर्जदार माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २(च) अन्वये माहिती मिळण्यास पात्र आहे आणि सेवा पुरवठादारांकडून अशी माहिती मिळवून पुरवणे टीआरएआयसाठी अनिवार्य आहे.

माहितीचा अधिकार नागरिकांना त्यांनी दूरसंचार सेवा पूर्ववठादारांच्या विरोधात केलेल्या तक्रारींची स्थिती जाणून घेण्याची शक्ती देखील पुरवतो. माहिती आयुक्त बसंत सेठ यांनी नमूद केले आहे की:-

*"माहितीच्या अधिकाराखाली ग्राहक त्यांनी सेवा पुरवठादारांच्या विरोधात केलेल्या तक्रारींवर काय कारवाई करण्यात आली हे जाणून घेऊ शकतात."*

**४. अन्य नियामक निगमांकडे माहितीच्या अधिकाराखालील अर्ज कसे सादर करावेत?**

सर्व नियामक निगमे केंद्र सरकारच्या अखत्यारीत असल्याने, माहितीच्या अधिकाराखालील अर्ज संबंधित सार्वजनिक प्राधिकरण/ नियामक निगमाच्या जन माहिती अधिकाऱ्यास संबोधित करावेत.

*<u>माहितीच्या अधिकाराखालील अर्जाचा नमुना</u>*

नोव्हेंबर २७, २०२१

प्रति,
जन माहिती अधिकारी,
बीएसएनएल कार्यालय,
करोलबाग, दिल्ली, भारत

महोदय/ महोदया,

खालील माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) अन्वये मागण्यात येत आहे. कृपया पुढील माहिती पुरवावी:-

१. डाटाच्या मंद वेगाचे कारण विचारण्यासाठी सादर केलेल्या तक्रार क्र ५४६/२० या तक्रारीची सद्यस्थिती.

आपला,
पीओएस

**अर्ज निकाली काढण्यापूर्वी कृपया पुढील बाबी विचारात घ्या:-**

१. आवश्यक असल्यास कृपया माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलाम ५(३) अन्वये माहिती मिळवण्यास सहकार्य करावे.

२. माहिती पूर्णतः किंवा अंशतः कोणत्याही अन्य खात्याकडे उपलब्ध असल्यास कृपया अर्ज कलम ६(३) अन्वये पूर्णतः किंवा अंशतः संबंधित खात्याकडे अंतरित करावा.